उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२९७ ■ गुरुवार ३० जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

भतवाल हॉस्पिटल म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

## राज्यातील सतरा लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी पंचेचाळीस लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी झाली



**मुंबई, दि. २९ : पीक विमा योजनेच्या धोरणात कुठलाही बदल करण्यात येणार नसून जुने तेच धोरण यंदा देखील कायम राहणार आहे. अडचणी येऊ नये म्हणून या संदर्भात काम केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या फायद्याचे काम होईल. धोरणात कुठले ही बदल केले नाहीत, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यातील एकतीस लाख प्रोत्साहन अनुदान लाभार्थी आहे. त्यातील सतरा लाख लोकांपर्यंत कर्जमाफी देत आहोत. प्रोत्साहन अनुदान तिसऱ्या किंवा चौथ्या यादीत येईल. यात पाच लाख लोकांचे केवायसी झालेले आहे. त्यामुळे त्यांना रक्कम द्यायला कुठली ही अडचण येणार नाही, अशी देखील माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.**

राज्यातील तेवीस लाख शेतकऱ्यांची प्रोत्साहन यादी आहे. त्यामुळे अजिबात काळजी करू नका. रक्कम कमी आली असली तरी वरची रक्कम राष्ट्रकृत बँक देणार असल्याचेही ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज योजनेतील जे शेतकरी राहिले होते त्यांना रक्कम दिली जाईल. यात पात्र शेतकऱ्यांना त्यांची रक्कम मिळणार आहे. तसेच साखरेच्या भावात वाढ झाली आहे. त्याचा फायदा नक्की शेतकऱ्यांना होणार आहे. मराठवाड्यात कमी पाऊस पडत असून आतापर्यंत मराठवाडा विभागात ७७ टक्के पाऊस पडला. तर कोकणात पाऊस जास्त आहे. कोकणात पेरणी ८४ टक्के पेक्षा जास्त झाली आहे. तर तिकडे अमरावतीत ९२ टक्के पेरणी झाली असून ठाणे जिल्ह्यात सर्वांत कमी पेरणी झाली आहे. मका, सुर्यफुल पीक पेरणी यंदा जास्त असून ४५ लाख १० हजार हेक्टर पेरणी झाली आहे. तर २४ हजार हेक्टर सोयाबीन पेरणीबाबत तक्रारी आल्या आहेत. खताचा साठा राज्यात मागणी प्रमाणे उपलब्ध आहे. त्यामुळे खताच्या बाबतीत घाबरण्याची गरज नाही. असेही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले.

### सरासरी ८४ टक्के पेरण्या

राज्यात सगळीकडे पाऊस बऱ्यापैकी पडत आहे. विशेषत: धरणांच्या पाणी पातळीमध्ये वाढ होते आहे. (पान ४ वर)

## माझी हत्या किंवा अटक शक्य आहे-हसीना शेख

नवी दिल्ली, दि. २९ : अटक, कारावास किंवा थेट फाशीच्या शिक्षेची टांगती तलवार असतानाही बांगलादेशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना मायदेशी परतण्याच्या निर्णयावर ठाम आहेत. आगामी डिसेंबर महिन्यापर्यंत मी बांगलादेशात परतणारच, असे हसीना शेख म्हणाल्या. एवढेच नाही तर मायदेशी परतल्यानंतर होणाऱ्या कोणत्याही गंभीर परिणामांना सामोरे जाण्याची आपली तयारी असल्याचे स्पष्ट केले आहे.

बांगला देशाच्या पंतप्रधान हसीना शेख यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. माझी हत्या केली जाऊ शकते. मला अटक होऊ शकते किंवा तुरुंगातही डांबले जाऊ शकते. मला माझ्या भवितव्याची पूर्ण कल्पना आहे. तरीही मला माझ्या मायदेशी परत जायचे आहे. कारण, माझे लोक मला हाक मारत आहेत, असे त्या म्हणाल्या. (पान ४ वर)

## जामद्यात पोलीसांनी राबविले कोंबींग ऑपरेशन रोकड, वाहने जप्त, सत्तावीस आरोपी गजाआड



**धुळे, दि.२९- निजामपूर पोलीस ठाणे हद्दीतील जामदे (ता. साक्री) येथे धुळे जिल्हा पोलीसांनी आज पहाटेपूर्वी दोन ते सकाळी आठपर्यंत कोंबींग व सर्च ऑपरेशन राबविले. या मोठ्या कारवाईत पोलिसांनी रोकड, पावणे पाच किलो चांदी, अठरा मोबाईल, लॅपटॉप, ४३ दुचाकीसह एकूण २७ जणांना ताब्यात घेतले पोलीस अधिक माहिती घेत आहेत. पोलिसांच्या या धडक कारवाईचे विविध स्तरावरून स्वागत होत आहे.**


पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक ओंकार गवळी यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांचे सुक्ष्म नियोजनात कारवाई करण्यात आली. जामदे गावात ड्रोनचा वापर करुन, घर व रस्ते यांची भौगोलिक माहिती संकलीत केली. विशेष मोहिमेसाठी स्थानिक गुन्हे शाखा धुळे, निजामपूर, धुळे तालुका, साक्री, शिंदखेडा, पिंपळनेर, मोहाडीनगर व पोलीस मुख्यालय येथील प्रभारी अधिकारी यांचेसह १७ पोलीस अधिकारी व १९० अंमलदार यांनी कामगीरी केली. सर्व पोलीस फौजफाटा रात्रभर कार्यरत होता.

जामदे गावातील काही गुन्हेगारांच्या टोळ्या परिसरात चोरी, जबरी चोरी, दरोडा सारखे गंभीर गुन्हे करीत होते. स्क्रैप असलेली कॉपर वायर विक्री करण्याचे फेसबुक सोशल मिडीयावर व्यापाऱ्यांना आमीष दाखवुन, त्यांना लुटण्यात येते होते. यात विशेषतः गुजरात, इंदुर (म. प्रदेश) व मुंबई येथील व्यापाऱ्यांना लुटल्याचे तपासात उघड झाले आहे. या गुन्हयांना प्रतिबंध व्हावा, गुन्हेगारांच्या टोळीस वचक निर्माण करण्याच्या उद्देशाने धुळे पोलीसांनी एकाचवेळी व्यापक कोंबींग व सर्च (पान ४ वर)

## नंदुरबार क्लिप प्रकरण भोवले अखेर विजय चौधरींचा राजीनामा

**नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी)- भाजपचे उत्तर महाराष्ट्र विभाग संयोजक विजय चौधरी यांनी आपल्या पदाचा राजीनामा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्याकडे सादर केला आहे. बनावट ऑडिओ क्लिप प्रसारित करून आपली व पक्षाची बदनामी करण्यासाठी राजकीय विरोधकांनी षड्यंत्र रचल्याचा आरोप करत, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी म्हणून आपण स्वेच्छेने पदाचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी राजीनामा पत्रात म्हटले आहे.**

राजीनाम्यात विजय चौधरी यांनी गेल्या १३ वर्षांपासून भारतीय जनता पक्षात विविध जबाबदाऱ्या पार पाडल्याचा उल्लेख केला आहे. ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष, नंदुरबार जिल्हाध्यक्ष, प्रदेश महामंत्री आणि उत्तर महाराष्ट्र विभाग संयोजक या पदांवर काम करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले आहेत. पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली असून, संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचा दावा त्यांनी केला आहे.



गेल्या काही दिवसांत प्रसारित झालेल्या ऑडिओ क्लिप बनावट असल्याचा दावा करत, आपण कोणालाही जातीवाचक शिवी दिलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. आपल्या राजकीय विरोधकांनी भाजपला कमकुवत करण्याच्या उद्देशाने हे षड्यंत्र रचल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांमार्फत निष्पक्ष चौकशी व्हावी आणि चौकशीवर कोणताही संशय राहू नये म्हणून उत्तर महाराष्ट्र विभाग संयोजक पदावरून मुक्त करण्याची विनंती त्यांनी केली आहे. चौकशीत सत्य जनतेसमोर येईल, असा विश्वास व्यक्त करत, पदाचा राजीनामा दिल्यानंतरही भारतीय जनता पक्षाचा एक निष्ठावान कार्यकर्ता म्हणून कार्यरत राहणार असल्याचे विजय चौधरी यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

## पतीविरोधात खोटी तक्रार दिली चौकशी करा- कल्याणी पवार


धुळे, दि.२९- प्रशांत दगाजी पाटील आणि ओमप्रकाश दगाजी पाटील यांच्या सांगण्यावरून मंजींत अशोक गाबडा याने हेतुपुरस्सर व द्वेषबुद्धीने खोटी तक्रार दाखल केली असून, याच्याशी आपले पती गौरव सुभाष पवार यांचा काहीही संबंध नाही, असा गंभीर आरोप कल्याणी गोविंद पवार यांनी केला आहे. याप्रकरणी सखोल चौकशी करून खोट्या तक्रारदारावर कडक कारवाई करण्याची मागणी कल्याणी गोविंद पवार यांनी अर्जाद्वारे पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

कल्याणी पवार यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांचे पती सध्या तुरुंगात असून त्यांच्याविरोधात काही घटकांकडून वारंवार खोटी व द्वेषपूर्ण (पान ४ वर)

## पवनचक्कीवरील अपघातात क.अभियंता गौरवसिंग गिरासे यांच्या निधनामुळे हळहळ

**नंदुरबार/धुळे, दि.२९- शिफ्ट इंजिनियर म्हणून कर्तव्य बजावत असताना झालेल्या दुर्दैवी अपघातात एका होतकरू तरुण अभियंत्याचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना नंदुरबार तालुक्यात घडली आहे. बलवंड-तिलाली परिसरातील सुझलॉन कंपनीच्या पवनचक्कीवर दुरुस्ती व देखभालीचे काम सुरू असताना झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेले गौरवसिंग युवराजसिंग गिरासे (वय २६, रा. ओसरली, ता. नंदुरबार) ह.मु. डी.जी.नगर दोंडाईचा यांचे दि. २५ जुलै २०२६ रोजी धुळे येथील विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले.**

मिळालेल्या माहितीनुसार, २४ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे ४ ते ५ वाजण्याच्या दरम्यान पवनचक्कीच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना हा अपघात झाला. या दुर्घटनेत गौरवसिंग यांच्या डोक्याला, बरगड्यांना, पोटाला तसेच उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर त्यांना तातडीने नंदुरबार येथील निम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी धुळे येथील विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. डॉक्टरांनी सर्वतोपरी प्रयतक करूनही त्यांना वाचविता आले नाही.



गौरवसिंग गिरासे हे गेल्या दीड वर्षांपासून सुझलॉन कंपनीत ज्युनिअर इंजिनियर म्हणून कार्यरत होते. मूळचे ओसरली येथील असलेले गौरवसिंग कुटुंबासह दोंडाईचा येथे वास्तव्यास होते. त्यांचे वडील दोंडाईचा येथील स्टार्च फॅक्टरीमध्ये वायरमन म्हणून कार्यरत असून काही महिन्यांतच सेवानिवृत्त होणार होते. कुटुंबातील एकुलते एक पुत्र असलेले गौरवसिंग हे आई-वडिलांचा मोठा आधार होते. त्यांच्या पश्चात आई, वडील आणि बहीण (पान ४ वर)

## भिमस्मृती दिनानिमित्त वाहतूक मार्गात बदल

धुळे, दि.२९- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्ले लळींग लांडोर बंगला परिसरात ३१ जुलै भिमस्मृती दिनानिमित्त यात्रा मेळावा, सभा, रक्तदान शिबीरसह सांस्कृतिक कार्यक्रम होतात.

या कार्यक्रमास धुळे जिल्ह्यासह जळगाव, नंदुरबार, नाशिक जिल्हा तसेच गुजरात व मध्यप्रदेशातून जनसमुदाय उपस्थित राहतात. त्यापार्श्वभूमीवर यादिवशी मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीनवरील अवजड वाहनांची वाहतूक वळविण्यात येत असल्याचे आदेश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी निर्गमित केले. मुंबई पोलीस अधिनियम व मोटार वाहन (पान ४ वर)

## म.न.पाची ग्रॅच्युइटीची रक्कम त्वरीत द्या-मागणी

धुळे, दि.२९-महापालिकेतील शंभरहुन अधिक कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युइटीची रक्कम थकीत आहे. दि.१५ ऑगस्ट २०२६ च्या आत ग्रॅच्युइटीची रक्कम, शिल्लक रजेची रक्कम व सातव्या वेतनाची रक्कम न दिल्यास महापालिकेच्या कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा लालबावटा म.न.पा.कामगार युनियन धुळेच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांना दिला आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, मनपा आयुक्त आल्यापासून फक्त दोन वेळा ग्रॅच्युइटीची रक्कम काढण्यात आली आहे. यापूर्वी दरमहा ग्रॅच्युइटीची रक्कम काढण्यात येत होती. अकाऊंट विभागात काम करणारे कर्मचारी तीन ते चार वर्षांपासून एकाच टेबलवर काम करत आहे. काही कर्मचाऱ्यांची रक्कम (पान ४ वर)

## महावितरणच्या कार्यालयासाठी प्रस्ताव सादर करा आ.अग्रवालांच्या मागणीवरुन ऊर्जा राज्यमंत्र्यांचे आदेश

**धुळे, दि.२९ - शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या मागणीनुसार वीज महावितरण कंपनीची शहरातील विविध भागांतील कार्यालये एकाच ठिकाणी आणण्याच्या उद्देशाने मध्यवर्ती कार्यालयाच्या इमारतीसाठी वीज महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी १५ ते २० कोटी रुपयांचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे निर्देश राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी आज दिले.**



धुळे शहरातील महावितरणच्या मध्यवर्ती कार्यालयासह खंडित वीजपुरवठा, नवीन वीजजोडणी, एचटी-एलटी स्थलांतर, पाणीपुरवठा केंद्रांना सुरळीत वीजपुरवठा, औद्योगिक जोडण्या आदी विषयांवर आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्याकडून ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता. या सर्व वीजविषयक प्रलंबित प्रश्नांवर मुंबईतील मंत्रालयात राज्यमंत्री बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली आज सकाळी आ. अग्रवाल यांच्या मागणीनुसार बैठक झाली. यावेळी आ.अग्रवाल यांच्यासह महावितरण कंपनीचे राज्याचे मुख्य अभियंता परदेशी, धुळ्याचे अधीक्षक अभियंता सायस दराडे, जळगाव परिमंडळाचे मुख्य अभियंता इब्राहिम मुलानी यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. बैठकीला धुळे महापालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस हे व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. (पान ४ वर)

## भिमस्मृती यात्रेसाठी ना.रावल व ना.शिरसाठ उपस्थित राहणार

धुळे दि.२८- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्ले लळींग लांडोर बंगला येथे भिम स्मृती यात्रा करीता जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार रावल यांच्यासह राज्याचे सामाजिक न्यायमंत्री ना.संजय शिरसाठ उपस्थित राहणार आहे. अशी माहिती आर.पी.आय.आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर जाधव, कार्याध्यक्ष शशिकांत यांनी दिली.

ना. रामदास आठवले यांच्या उपस्थितीत १९९३ पासून भिमस्मृती यात्रेस प्रारंभ करण्यात आला. या यात्रेसाठी महाराष्ट्रासह गुजरात, मध्यप्रदेश राज्यातून भिम सैनिक मोठ्यासंख्येने अभिवादन करण्यासाठी आवर्जुन उपस्थित राहतात. भिमस्मृती यात्रेसाठी आ. अनुप अग्रवाल, (पान ४ वर)

## नगरसेवकांच्या कामांची अडवणूक शहाद्यात भाजपाची पत्रकार परिषद

**शहादा, दि.२९(का.प्र.) - शहादा नगरपरिषदेत निवडून येऊन साधारण सात महिन्यांचा कालावधी उलटला तरी सत्ताधारी नगराध्यक्ष शहराच्या मूलभूत विकास कामांकडे अक्षम्य दुर्लक्ष करत आहेत. भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांनी प्रभागांतील २५० हून अधिक आवश्यक विकास कामे सुचवूनही एकाही विषयाचा अजेंड्यावर समावेश न करता केवळ राजकीय वैमनस्यापोटी कामे रखडवली जात आहेत, असा घणाघाती आरोप करत भाजपच्या लोकप्रतिनिधींनी पत्रकार परिषदेत नगराध्यक्षांच्या मनमानी कारभाराची व सोशल मीडियावरील कुटील अपप्रचाराची पोलखोल केली.**



पत्रकार परिषदेत माहिती देतांना उपनगराध्यक्षा माधवी मकरंद पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधींनी सांगितले की, सार्वत्रिक निवडणुकीनंतर भाजप नगरसेवकांनी आपापल्या प्रभागातील तातडीच्या व अत्यंत आवश्यक विकास कामांचे विषय नगरपालिकेकडे सादर केले होते. मात्र, सामान्य सभा असो की स्थायी समितीची सभा, सत्ताधाऱ्यांनी एकाही कामाचा विषय अजेंड्यावर घेतला नाही. या अन्यायाविरोधात भाजप नगरसेवकांनी महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५मधील कलम ८१ (२) मधील तरतुदींनुसार जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्याकडे दाद मागितली. भाजप नगरसेवकांनी १० एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन १५ दिवसांच्या आत विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्याची विनंती केली होती.

जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार, २१ एप्रिल रोजी नगराध्यक्षांकडे रीतसर पत्र देऊन सर्व भाजप नगरसेवकांनी सुचविलेल्या विकास कामांचा समावेश करून १५ दिवसांत विशेष सर्वसाधारण सभा घेण्याची मागणी करण्यात (पान ४ वर)

## ४४ वे पुण्यस्मरण




स्व. मुकुंदशेठ शंकरलालजी गिंदोडीया
(स्वर्गवास दि.३०/७/१९८२)

सरले जीवन, विरले दर्शन,
उरल्या केवळ स्मृती
व्याकुळ नेत्र आज आपणास
श्रद्धांजली अर्पिती!

* शोकाकुल *
कैलास शंकरलाल गिंदोडीया
व गिंदोडीया परिवार, धुळे.

## मा.आ.पाटलांतर्फे कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांसाठी मोफत केवायसी

**धुळे, दि.२९- मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपा महायुती सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना जाहिर करुन पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी जाहिर केली आहे. प्रत्यक्षात लाभ मिळवून घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांकडून केवायसी करणे आवश्यक आहे. त्याकरीता मा.आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने धुळे ग्रामीणमधील पात्र शेतकऱ्यांची मोफत केवायसी करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**



याबाबत सविस्तर वृत्त असे कि, शेतकरी तसेच सर्वसामान्य जनतेला विविध योजनांचा लाभ मिळावा म्हणून धुळे ग्रामीणचे मा.आ.कुणाल पाटील यांच्यामार्फत धुळे येथील संपर्क कार्यालयात मोफत सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. त्याअनुषंगाने कर्जमुक्ती योजनेची पात्र शेतकऱ्यांची पहिली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहिर केली आहे. कर्जमुक्तीचा प्रत्यक्ष लाभ मिळवून घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांना स्वत: केवायसी करुन घेणे आवश्यक आहे. त्याकरीता मा.आ.कुणाल पाटील यांनी धुळे ग्रामीणमधील शेतकऱ्यांसाठी मोफत केवायसी करण्याची सुविधा कार्यान्वित केली आहे. मोफत ई-केवायसीकरीता धुळे शहरातील मा.आ.कुणाल पाटील यांचे संपर्क कार्यालय, प्रांत ऑफीससमोर, जिजामाता शाळेशेजारी, धुळे (संपर्क- गोरख भदाणे-८९९९९१२१८१ हर्षल शिंदे-९९७५२७०५१४,अमोल कठाळे-९५११२८६७८८,शाम पाटील-८७९३९९३३६५) येथे उपस्थित संपर्क साधावा. त्यासाठी आधार कार्ड, आधार सलग्नित क्रमांक असलेला मोबाईल, ॲग्रीस्टॅक(फार्मर आयडी) क्रमांक, (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,31,000 रु.+3% GST
सोने- 24 K -1,43,000 रु.+3% GST
चांदी- 2,24,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## दोंडाईचा व अक्कलकोस नो फ्लायिंग झोन घोषित

धुळे, दि. २९- राज्यपाल जिष्णु देव वर्मा हे दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा व अक्कलकोस ता. शिंदखेडा दौऱ्यावर येत असून विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने दोंडाईचा ते अक्कलकोस या सुमारे ४० चौ. कि.मी. परिसरात विनापरवाना व बेकायदेशीर ड्रोन उड्डाणास बंदी घालण्यात आली आहे. याबाबतचे आदेश पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी निर्गमित केले आहेत.

दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत दोंडाईचा व अक्कलकोस परिसरात पोलीस विभागाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणालाही (पान ४ वर)




हार्दिक अभिष्टचिंतन !



श्री.राजेंद्र संतोष चौधरी (भटुबापू)
मा.सरपंच तथा तेली समाज अध्यक्ष वलवाडी
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
- शुभेच्छुक -
मुबारक पिंजारी
चेतन पाटील
राजु सर पाटील
गुलाब पाटील
गोपीचंद पाटील
शरद कुंवर
संजू शेरसिंग
कैलास पावरा
प्रमोद जोशी
सोनुभाऊ अहिरे
राकेश मोरे
सुनिल पाटील
गणेश पाटील
प्रविण भामरे
संदिप पावरा
पिंटू पावरा

# आपला महाराष्ट्र

## आंदोलनाचा शिमगा सरला, कवित्व कायम

जंतर-मंतर वरील तरुणाईच्या आंदोलनाची धग अजून कायम आहे. सोशल मीडियावर आणि वृत्तपत्रांमध्ये पोलिसांनी केलेल्या मारहाणीची, सोनम वांगचुक यांच्या उपोषणाची, त्यांनी सोडलेल्या उपोषणाची, त्यांच्या पतकीने केलेल्या वक्तव्याची, काँग्रेस सहित लोकशाही आघाडीतील विविध राजकीय पक्षांच्या समर्थनाची, काँग्रेसने पंतप्रधानांच्या निवासा समोर केलेल्या आंदोलनाची, मनुष्यबळ मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या घोषणेची, त्यानंतर ते सभागृहात आलेले असताना त्यांच्या जल्लोषात झालेल्या स्वागताची, सभागृहात सादर झालेल्या पेपर फूट प्रकरणी कडक कायद्याची तरतूद असलेल्या विधेयकाची आणि सत्तारूढ पक्षाच्या काही सदस्यांनी ज्या काही कोट्या केल्या त्यावर विरोधकांनी केलेल्या आग पाखडीची चर्चा अजूनही जोरात सुरू आहे. याचाच अर्थ होळीचा शिमगा सरला तरी त्याचे कवित्व अजून कायम आहे. सोशल मीडियावर आणि छोट्या मोठ्या वृत्तपत्रांमधून विविध पत्रकार, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, अनेक राजकीय कार्यकर्त्यांनी अनेक मते या आंदोलनाविषयी व्यक्त केली. अजूनही ती चालू आहेत. अनेकांच्या मते अशा आंदोलनाला पर्याय नाही. काही जण तर असे म्हणतात की सोनम वांगचुक आणि अभिजीत दिपके अचानक नेते झाले आणि अचानक गंमत म्हणून स्थापन झालेल्या पक्षाचे सर्वे सर्वा झाले. त्यामुळे इतरांच्या मनात असूया निर्माण झाली . तर काहींचे म्हणणे असे आहे की, हे संपूर्ण आंदोलन शासक पक्षाची योजनाबद्ध रणनीती आहे. त्याबद्दल असे म्हणणारे काही पुरावे सादर करतात. ते काहीही असो परंतु युवकांचे आंदोलन सध्या तरी चर्चेच्या केंद्रस्थानी आहे.

अनेकांनी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाशी जंतर-मंतरवरील आंदोलनाची तुलना केलेली आहे. ती त्यांची मते असू शकतात परंतु वास्तवात तशी परिस्थिती नाही. जेपी आंदोलनामध्ये आणि या आंदोलनामध्ये प्रचंड फरक आहे. गुणात्मक फरक असल्यामुळे त्याची तुलना होऊ शकत नाही. जेपींचे आंदोलन हे सरळ सरळ सत्तेला आव्हान देणारे होते. त्या आंदोलनाने केवळ सत्तेला आव्हानच दिले नाही तर ती उलथून टाकण्याची क्षमता देखील ठेवली होती. या आंदोलनात शिक्षणाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून फक्त धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा असा एक कलमी मागणीचा कार्यक्रम होता. तो यशस्वी झाला आणि आता विद्यार्थ्यांवर दाखल होणारे खटले मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. पंतप्रधानांनी नीट परीक्षेच्या शुद्धीकरणासाठी किंवा पारदर्शकतेसाठी नंदन निलकेणी यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती घोषित केलेली आहे. ही समिती ज्या शिफारशी करेल त्याची अंमलबजावणी सरकार करेल असेही पंतप्रधानांनी म्हटलेले आहे. त्यामुळे एकीकडे शिक्षणाच्या शुद्धीकरणाचा मुद्दा मोडीत काढतानाच दुसरीकडे प्रधान यांच्या तोडीचे कट्टरवादी दुसरे शिक्षण मंत्री प्रभारी म्हणून कामकाज बघणार आहेत. प्रधान यांनी अनेक बदल अभ्यासक्रमात केले तसा त्यांच्यावर आरोप आहे. या अभ्यासक्रमातून विज्ञानवादी दृष्टिकोन काढून टाकण्याचा मोठा भाग आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शासक पक्षाच्या मातृसंस्थेचे चालक यांनी वेगळेच वक्तव्य केलेले आहे. अभ्यासक्रमात देव देवतांचा समावेश असावा असे ते म्हणतात. यावर अजून कोणी भाष्य केलेले नाही परंतु हे वक्तव्य फार विचित्र आहे. विद्यमान व्यवस्थेची वाटचाल त्याच दिशेने चालू असून मग शुद्धीकरणाचा कोणता मुद्दा आंदोलक पुढे करणार आहेत यावर प्रश्नचिन्ह लागलेले असेल. दुसरीकडे नीट परीक्षेच्या संदर्भात अतिशय कडक कारवाई होऊ शकेल असे विधेयक वरिष्ठ सभागृहात चर्चेला आलेले आहे. ते चर्चे अंती मंजूर होईलच विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या मतांचा विचार त्यात केला जाईल किंवा कसे हे अजून ठरायचे आहे.

एवढे सगळे आंदोलन झालेले असताना देशभरात जो कोचिंग क्लासेस चा धंदा चालू आहे त्यावर मात्र कुठलाही विद्यार्थी किंवा नेता बोललेला नाही. तथापि सत्ता रूढ पक्षाचे मित्र शिवसेनेचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी मात्र या विषयीचा उल्लेख आपल्या भाषणात केलेला दिसला. कोचिंग क्लासेस चा ५०००० कोटींचा उद्योग असून २०३० पर्यंत तो एक लाख कोटी चा टप्पा पार करेल. त्यामुळे या फोफावलेल्या व्यवसायावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे .कोचिंग क्लासेस मध्ये विद्यार्थ्यांकडून तीन लाख ते पाच लाख रुपयांचे शुल्क वसूल केले जाते म्हणून त्यासाठी नियम आवश्यक असल्याचे शिंदे यांनी नमूद केलेले आहे. ही चर्चा समाधानकारक म्हणावी लागेल. त्याचवेळी शासक पक्षाच्या खासदार आणि नेहमी वादग्रस्त ठरणाऱ्या कंगना राणावत यांनी निदर्शकाच्या विरोधात सोशल मीडियावर वादग्रस्त टिपणी केलेली आढळली. त्यांनी जैन झी चा उल्लेख गटार पिढी असा केलेला आहे. या विद्यार्थ्यांच्या ध्वनी चित्रफिती बघून आपल्याला मळमळते, जंतर मंतर येथे झालेली निदर्शने, घाण आणि कचरा हे कुरूपतेचे दर्शन होते असेही कंगना यांनी म्हटले आहे. झुरळांना जन्म कोणी दिला आणि त्यांचे पालन पोषण कोण करत आहे असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. त्याचवेळी निदर्शक विद्यार्थ्यांवर गोळ्या झाडून त्यांना ठार करायला हवे होते असे वादग्रस्त विधान आणखी एका नेत्यांनी केले आहे. त्यांच्याविरुद्ध डाव्यांनी गुन्हा नोंदविला आहे. विशेष म्हणजे जे लोक नाईलाज म्हणून, अंधश्रद्धा म्हणून, त्यांना काही सुचत नाही म्हणून शासक पक्षाची री ओढत आलेले आहेत त्यांचीच मुले या आंदोलनात अग्रभागी होती.त्यामुळे काहींच्या मते हे आंदोलन आता केवळ परीक्षा सुधारणेच्या प्रश्नापुरता मर्यादित राहिलेले नाही. तो युवकांचे भविष्य, रोजगार आणि शासनाच्या उत्तरदायित्वाशी संबंधित राष्ट्रीय प्रश्न बनला आहे. सरकारने आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांवर ठोस आणि कालबद्ध निर्णय घेतल्यास परिस्थिती शांत होऊ शकते आणि शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांचा मार्ग मोकळा होऊ शकतो. परंतु केवळ पोलीस बळ आणि प्रशासकीय नियंत्रणाद्वारे अशाच प्रकारे वेळोवेळी आंदोलन दडपण्याचा प्रयतक सुरू राहिला, तर युवकांचा असंतोष अधिक व्यापक होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत हे आंदोलन देशव्यापी विद्यार्थी-युवकांना सोबत घेत विविध सामाजिक आणि राजकीय संघटनांनाही आपल्या सोबत जोडू शकते. आंदोलनाशी संबंधीत म्होरके या बाबत नेमका काय विचार करतात.तत्कालिक प्रश्नांनाच महत्व देतात की दीर्घकालीन मुद्दे हातात घेतात ते अद्यापि ठरलेले नाही असे दिसते.परिणामी संसद, न्यायपालिका आणि सरकारवर संस्थात्मक सुधारणांसाठीचा दबाव अधिक वाढण्याची शक्यता आहे.असाच दबाव अण्णा हजारे यांनी तयार केला होता.त्यांनी आपले आंदोलन लोकपालाच्या संकल्पनेवर केंद्रीत केले होते.पण त्यातून खोदा पहाड निकला चुहा अशी परिस्थिती निर्माण झाली होती.लोकांनाही असे वाटत होते की, लोकपाल आल्याने चिंता मिटली.सगळे प्रश्न आता चुटकीसरशी सुटतील.पण सगळे फूस्स झाले.तसे या आंदोलनाचे होऊ नये.

## सोनवद पाटचारीतून पाणी सोडले आ.राम भदाणेंच्या पाठपुराव्याला यश



**धुळे, दि.२९- धुळे तालुक्यातील काही गावांचा पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेली मागणी आणि धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांच्या ठोस विशेष पाठपुराव्यामुळे पांझरेचे अतिरिक्त पाणी थेट सोनवद पाटचारीत सोडण्यात आले. तसे निर्देश आमदार भदाणे यांनी दिले होते. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे यांच्या हस्ते विसर्ग सोडण्यात आला.**

माजी अध्यक्ष मनोहर भदाणे म्हणालेत, पावसाळ्यात अक्कलपाडा धरण भरल्यानंतर वाहून जाणारे पाणी योग्य नियोजनाने लाभक्षेत्रातील गावांपर्यंत तात्काळ पोहोचण्याची भूमीका आमदार राम भदाणे यांची आहे. तसेच रेल्वेच्या कामामुळे पाटचारी नादुरुस्त झाली होती. आमदार भदाणे यांनी तात्काळ ही दुरूस्ती करायला लावली. यामुळे सोनवद पाटचारीत पाणी सोडण्याचा मार्ग मोकळा झाला. म्हणूनच योग्य वेळी पाण्याचा विसर्ग झाला. त्यांच्या प्रयतकांमुळे पांझरेचे पाणी सोनवद प्रकल्पात सोडल्याने भूजल पातळी वाढून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

भाजपा जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे म्हणालेत, या पाण्याचा थेट फायदा कुंडाणे, निमखेडी, जापी, न्याहळोद, कौठळ, कापडणे आणि धनूर या धुळे तालुक्यातील गावांना होणार आहे. या गावांतील विहिरी, कूपनलिका पुन्हा पाण्याने भरण्यास मदत होणार आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सुटण्यास मदत होणार आहे. पाणी विसर्ग झाल्याने कुंडाणे, निमखेडी, कापडणे, न्याहळोद, कौठळ, जापी व धनूर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



## सुतार समाज सेवा मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**धुळे, दि.२९- सुतार समाज सेवा मंडळ, धुळे (महाराष्ट्र राज्य) यांची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी दि.२६ जुलै २०२६ रोजी, श्री विश्वकर्मा भवन, डी-मार्ट शेजारी, मालेगाव रोड, धुळे येथे मुख्य संपादक तथा विश्वकर्मा प्रसाद मासिकाचे जी.डी. सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राज्यभरातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या पदाधिकारी, समाजबांधव व महिला भगिनींच्या मोठ्या उपस्थितीत समाजाच्या विकास, संघटनात्मक बळकटी आणि सामाजिक सुधारणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.**

सभेस प्रमुख मार्गदर्शक ए. बी. वाघ, अध्यक्ष भटू तात्या बागुल, कार्याध्यक्ष चंद्रकांत शेलार, उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक दीपक शेलार, राजेंद्र चव्हाण (नाशिक), पप्पू शेलार (छत्रपती संभाजीनगर), किशोर बागुल (कल्याण), विठोबा वाडेकर (भडगाव), सचिव हिरालाल चव्हाण, सहसचिव कैलास शेलार, खजिनदार विशाल वाडेकर, सहखजिनदार देवेंद्र शेलार, शिक्षण समितीचे चेअरमन सुभाष वाडेकर, बांधकाम समितीचे चेअरमन किरण वाघ, व्हाइस चेअरमन संदीप बागुल, तक्रार निवारण समितीचे चेअरमन किशोर सोनवणे, जनगणना समितीचे चेअरमन किशोर शेलार, तांत्रिक सल्लागार विजय वाघ, महिला मंडळ अध्यक्षा करुणा बोरसे, सचिव निवेदिता शेलार यांच्यासह धुळे, जळगाव, भुसावळ, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, उल्हासनगर, अंबरनाथ, मुंबई, सुरत व बडोदा येथील पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात अध्यक्ष भटू तात्या बागुल यांनी वर्षभरातील समाजोपयोगी उपक्रमांचा आढावा घेत भावी वाटचालीचे ध्येय स्पष्ट केले. सभेत विविध समित्यांच्या प्रमुखांनी वर्षभरातील कार्याचा सविस्तर अहवाल सादर केला. यावेळी समाजात वाढत चाललेल्या प्री-वेडिंग शूट, मेहंदी, संगीत समारंभ तसेच सकाळी वैदिक विवाह करून दुपारी पुन्हा विवाह सोहळ्याचे प्रदर्शन अशा अनावश्यक प्रथांबाबत महिला मंडळ धुळे, महिला मंडळ छत्रपती संभाजीनगर तसेच राजेंद्र मोरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या प्रथांमुळे पाहुण्यांची गैरसोय होत असून समाजाने अशा प्रथांना आळा घालण्यासाठी ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. उपस्थित समाजबांधवांनीही या भूमिकेला समर्थन दिले. विश्वकर्मा भवनाच्या नूतनीकरणाबाबत तांत्रिक सल्लागार विजय वाघ, दीपक शेलार, दिगंबर वाडेकर, छगन वाडेकर (जळगाव), चंद्रकांत शेलार तसेच ए. बी. वाघ यांनी विविध सूचना मांडत विकास आराखड्याबाबत मार्गदर्शन केले. सभेदरम्यान शासकीय व निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले, पदोन्नती प्राप्त केलेले, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे तसेच विशेष पुरस्कार प्राप्त समाजबांधव व भगिनींचा सत्कार करण्यात आला. तसेच दहावी-बारावी परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या तसेच पदवी प्राप्त विद्यार्थी-विद्यार्थिनींचा गौरव करून त्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. अध्यक्ष जी. डी. सोनवणे यांनी समाजातील एकोपा, शिक्षण, संस्कार आणि सामाजिक सुधारणांचे महत्त्व अधोरेखित करत समाज प्रबोधनासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल बागुल व दीपक शेलार यांनी केले, तर सचिव हिरालाल चव्हाण यांनी आभार मानले. सभा यशस्वी करण्यासाठी राहुल वाडेकर, संतोष वाघ, प्रवीण चव्हाण, कैलास शेलार, कल्पेश वाडेकर, उमेश वाघ, केतन बागुल, विकास सोनवणे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## तरुणाला मारहाण दहा हजार लुटले

धुळे, दि.२९- येथील रामनगर परिसरातील तरुणाला मारहाण करीत त्याच्याकडील दहा हजारांची रोकड पाच जणांनी हिसकावून घेतल्याची घटना घडली. याप्रकरणी पाच जणांविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल झाला.

रामनगर परिसरात २७ जुलैस रात्री साडेनऊच्या सुमारास एका घरात प्रसाद चंद्रकांत सरदार रा. भीमनगर, साक्री रोड, धुळे यास काठी, बेल्ट, हाताबुक्क्यांनी मारहाण केली. त्याच्या पॅन्टच्या खिशातील दहा हजारांची रोकड हिसकावून घेतली. या प्रकरणी प्रसाद सरदार याने दिलेल्या फिर्यादीनुसार सनी साहेबराव सोनवणे, मोहित महेंद्र ठाकूर, भूषण गणेश गोखले, सनी गणेश गोखले यांच्याविरुध्द धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे मोहाडी प्र.लळींग महानगरपालिका हद्दीतील गट नं.४६+४७+४८ पैकी प्लॉट नं.९० चे क्षेत्र ५८.५० चौ.मी.

| यांस | मापे | चर्तु:सिमा |
|---|---|---|
| पुर्वेस- | ४.५ मी., | रस्ता, |
| पश्चिमेस- | ४.५ मी., | प्लॉ.नं.५०, |
| दक्षिणेस- | १३ मी., | प्लॉ.नं.८९, |
| उत्तरेस- | १३ मी., | बोळ ३ मी. |

येणे प्रमाणे मी मिळकतीचे मालक महेंद्र सुधाकर पाटील रा.मोहाडी उपनगर ता.जि. धुळे यांनी माझे आशिले यांच्यासोबत सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यानीशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ०७ दिवसानंतर आलेल्या हरकती, लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचाही कोणतेही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचेमार्फत प्रसिध्दीस दिले असे.

ठिकाण- धुळे,
दिनांक- २७/०७/२०२६.

**अॅड.उमेश व्ही.मुसळे**
प्लॉट नं.३१, कृष्णा सोसायटी, एकता नगर, नकाणे रोड, देवपूर, धुळे-४२४००२.
**मो.नं.८४८३८७०६२८**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हितसंबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानीक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे मालक श्री.कांतीलाल बाबुलाल जैन रा.३४, जी.बी.नगर, धुळे यांच्याशी आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदेकरार केलेला असून या सौदे करारपोटी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे तसेच लवकरच सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण होणार असून सदर मिळकतीच्या टायटल व्हेरीफिकेशन हेतू सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

सदर मिळकतीत कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, कोणाचेही गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदेकरार हक्क अगर खरेदी हक्क वैगेरे काहीही असल्यास किंवा संकल्पीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत त्याबददल स्वताच्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास खालील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजीत मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे असे समजून सदर व्यवहार पूर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, कळावे.

**परिशिष्ट**

मौजे धुळे ता.जि.धुळे येथील धुळे महानगरपालिका हद्दीतील स.क्र.५५०/ब.क.ड पैकी प्लॉट क्रंमाक २१ चे एकूण क्षेत्र १८८.५० चौ.मी. यासी फायनल प्लॉट कंमाक २१७ पैकी प्लॉट क्रंमाक २१ चे एकूण क्षेत्र १८८.५० चौ.मी. ची मिळकत, यासी चर्तु:सिमा येणे प्रमाणे.

| | |
|---|---|
| पुर्वेस- | रस्ता, |
| पश्चिमेस- | फायनल प्लॉट क्रंमाक २१७ पैकी प्लॉट क्रंमाक २२, |
| दक्षिणेस- | फायनल प्लॉट क्रंमाक २१७ पैकी प्लॉट क्रंमाक २०, |
| उत्तरेस- | पोलीस लाईन |

सदर जाहीर नोटीस अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. दिनांक- २८/०७/२०२६.

**अॅड.शैलेश मदनलाल पंसारीया**
ऑफिस - ६७, मुरलीधर भाईजी नगर, चक्करबर्डी रोड, धुळे-४२४००१.
**मो.नं.९७६६२५५७७९, ९१७२१८१७७७**

### टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व हितसंबंधी व वित्तीय संस्था, यांना या जाहीर नोटीसीने आमचे पक्षकार यांचे तर्फे अॅड.बाळासाहेब अ.पवार रा धुळे यांचे मार्फत कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार (विकत घेणार) यांनी श्री.राध्येश्याम भगवानदास शर्मा खंडेलवाल रा.शिवतारा अपार्टमेंट गरूड बाग धुळे (विक्री करणार) यांचे मालकीची मौजे धुळे ता.धुळे येथील सर्व्हे नंबर ५०४/२अ२ पैकी प्लॉट नंबर १५ क्षेत्र १३५ चौ.मी. बखळ प्लॉट ही मिळकत यास चतु:सिमा पुर्वेस- प्लॉट नं.३१, पश्चिमेस- प्लॉट नं.१६, दक्षिणेस- रस्ता, उत्तरेस- लागू स.नं.

या मिळकती खरेदीचा सौदा मिळकत मालक (विक्री करणार) व आमचे पक्षकार (विकत घेणार) यांचेत झालेला असून मिळकत मालक यांना आमचे पक्षकार यांनी बयाणा रक्कम देखील अदा केली आहे.

सदर मिळकती वर कोणताही बोजा नाही व मिळकतीचे टायटल क्लीयर आहे असे विक्री करणार यांचे म्हणणे आहे.

सबब उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, बोजा, गहाण, भाडेपटटा, टाच, जप्ती, खरेदी-विक्रीकरार, सौदा पावती, हस्तांतरण, हिस्सा, अधिकार, बक्षिस, वारस हक्क, कोर्ट केसेस, हितसंबंध असल्यास व नियोजीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसाचे आत आमचेकडे भेटून लेखी मुळ कागदपत्रासह हरकत नोंदवावी मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे वर बंधनकारक राहणार नाही. मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची व कोणचाही हितसंबंध नाही असे गृहीत धरून खरेदी करतील. परस्पर वर्तमान पत्राव्दारे घेतलेली हरकत ग्राहय धरली जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकारने दिलेल्या माहिती व कागदपत्र, अधिकारावरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

दिनांक- २०/०७/२०२६.

**अॅड.बाळासाहेब अ.पवार**
अॅडव्होकेट व नोटरी (भारत सरकार)
ऑफिस - अप्पर ग्राऊंड फ्लोअर गाळा नंबर ५, शिवतिर्थ व संतोषीमाता चौक जवळ, धुळे. **मो.नं.९४२३२३२९०४**

## महाराष्ट्र राज्य नेटबॉल क्रीडा स्पर्धेत मुक्तागणच्या खेळाडूंना सुवर्णपदक

धुळे, दि.२९- शहाजीराजे भोसले क्रीडा संकुल, अंधेरी येथे नुकतीच महाराष्ट्र राज्य क्रीडा स्पर्धा संपन्न झाली. यात नेटबॉल मिश्र गटात मुक्तांगण शैक्षणिक प्रांगणाच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. यात मुक्तांगणच्या खेळाडूंनी दमदार व शिस्तबद्ध खेळाचे प्रदर्शन करत अतिशय चुरशीच्या सामन्यांमधून अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. अंतिम सामन्यातही चंद्रपूर जिल्ह्याचा पराभव करून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. यानंतर होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत, मुक्तांगण शैक्षणिक संकुलच्या पायल पाटील व अनुष्का अहिरे या महाराष्ट्र संघात प्रतिनिधित्व करणार आहेत.

केरळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेत येथील कु. पायल पाटील व कु. अनुष्का अहिरे या दोन्ही खेळाडू खेळणार आहेत. महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल व सुवर्ण पदकाच्या मानकरी ठरल्याबद्दल इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे तसेच प्रतिष्ठानच्या सचिव तथा माजी जि.प.सदस्या शालिनीताई बाळासाहेब भदाणे यांनी खेळाडूंचे मन:पूर्वक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रकाश में आज पैसा ये पैसा




राजेंद्र कुमार, वैजयंती माला, मुमताज, अजीत, जॉनी वॉकर, मुकरी आगा, डेविड, ललिता पवार

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६९२/२०२६, नि. ,

१) अलकाबाई प्रल्हाद. माळी, २) भुमिका प्रल्हाद माळी,
३) अश्विनी प्रल्हाद माळी, ४) अनिकेत प्रल्हाद माळी,
अ.नं.१ ही स्वत:साठी व अ.नं.४ ची अ.पा.क आई म्हणून.
सर्व रा.मांडळ ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

**विरूध्द**

कोणीही नाही. ....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार अलकाबाई प्रल्हाद माळी वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे प्रल्हाद सुका माळी हे दि.२४/११/२०२५ रोजी मौजे मांडळ ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता. अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे प्रल्हाद सुका माळी यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.२८/८/२०२६ रोजी ठिक १०:३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजुर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.६१७/२०२६, नि.६,

१) चंदनबाई संतोष पाटील, रा.करवंद, ता.शिरपूर, जि.धुळे,
२) दशरथ निंबा पाटील, रा.करवंद, ता.शिरपूर, जि.धुळे,
ह.मु. नंदुरबार, ता.जि.नंदुरबार,
३) राजूबाई झावरु पाटील, रा.दापुरा, ता.जि.धुळे,
४) सुनंदा माधवराव पाटील,
रा.नंदुरबार, ता.जि.नंदुरबार ....अर्जदार

**विरूध्द**

कोणीही नाही. ....जाबदेणार

X

कै.संतोष रामचंद्र मराठे (पाटील), मृत्यू दि.२६/०१/२००२,
रा.करवंद, ता.शिरपूर, जि.धुळे, ....मयत

ज्याअर्थी मयत संतोष रामचंद्र मराठे (पाटील) हे दि.२६/०१/२००२ रोजी मौजे- करवंद, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच औपचारीक कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.१७/८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि.२७/६/२०२६

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता. २३ से रोज १ खेल टा. १२ बजे
(हिंदी मध्ये) धमाल- 4
bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता. २३ से रोज ३ खेल टा. २:४५,६,९:१० बजे
(हिंदी मध्ये) जननेता
bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

### जाहीर नोटीस

तमाम नागरिकांना व सर्व संबंधित वित्तिय संस्था व निमसरकारी बँका, पतसंस्था वगैरे यांना सदर जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे, मौजे शिंगावे येथील बिनशेती सर्वे नं.१३२/१/अ/ब/२ पैकी प्लॉट नं.११ पश्चिमेकडील क्षेत्र- ८७.६८ चौ.मी. व त्यावरील बांधकाम तळमजला क्षेत्र- ४५.६८७ चौ.मी व पहिला मजला क्षेत्र- ४५.६८७ चौ.मी. हे बिनशेती रहिवासी प्लॉट व बांधकाम वंदना हिरालाल चौधरी यांचे मालकीची व कब्जे उपभोगात आहे.

वरील प्लॉट हे आमचे अशील श्री.तेजस संजय कुलथे, रा.वरचे गाव, बालाजी मंदिर शिरपुर, ता.शिरपुर, जि.धुळे यांनी सदर प्लॉटवर एच डि एफ सी बँक ली धुळे यांचेकडून कर्ज घेवून खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे. तरी सदर प्लॉट मिळकतीं संबंधी कोणाचे खरेदी, विक्रि, गहाण, बक्षीस, टांच, जप्ती, भाडे करारनामा, मुख्त्यापत्र, अधिकार, बोजा, वारसहक्क, पोटगीहक्क, बँकबोजा, पतसंस्थाबोजा अगर इतर हस्तांतरीत हक्क अधिकार असल्यास खालील पत्यावर ०७ दिवसाचे आत कळविण्यात यावे व मुळ कागदपत्र दाखवून आमची खात्री करून द्यावी मुदतीत लेखी हरकती अथवा तक्रार न आल्यास सदर मिळकती निर्बोज समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती बंधनकारक राहणार नाहीत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. ठिकाण- शिरपूर, दिनांक- २९/०७/२०२६.

**अॅड.नरेंद्र आर करंकाळ**
ऑफिस- कोर्टासमोर, शिरपूर, जि.धुळे. **मो.नं.९९२३९००४००**

### जाहीरनामा नोटीस

**शिरपूर येथील म.तहसिलदार सो., तथा कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

जन्म नोंद अर्ज नं. /२०२६

मगन हिरामण कुंभार,
रा.खर्दे बुा., ता.शिरपूर जि.धुळे. ....अर्जदार

**विरूध्द**

म.ग्रामपंचायत अधिकारी सो.,
ग्रामपंचायत, खर्दे बुा., ता.शिरपूर, जि.धुळे. ....जाबदेणार

अर्जदाराचा मुलगा नामे- समाधान मगन मोरे (कुंभार) याचा जन्म दि.०२/१०/१९९८ रोजी मौजे- खर्दे बुा, ता.शिरपूर, जि.धुळे येथे झाला असून, अर्जदारास सदरचा जन्म दाखला मिळावा म्हणून त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२) (३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. अर्जदारास सदरचा जन्म दाखला शैक्षणिक व शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार वा त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाचे आत आपण स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनीधी वा वकीलांमार्फत म.तहसिलदार सो. शिरपूर, जि.धुळे यांचे कोर्टात हजर राहुन आपली हरकत/आक्षेप नोंदवावी, अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल.

दि.२९/७/२०२६

**अॅड.ज्योस्त्ना एन.गिरासे**

## पान १ वरुन

## राज्यातील सतरा लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी

फक्त मराठवाड्यात पाऊस कमी आहे, पण येणा-या दिवसात तिथे ही पावसाचा अंदाज आहे. कोकणात १११ टक्के, नाशिक ८३, पुणे ८७, मराठवाडा ७७ आणि विदर्भात ७३ टक्के पाणीसाठा आहे. तर राज्यात सरासरी ९४ टक्के पाऊस झाला आहे. राज्यात सरासरी ८४ टक्के पेरण्या झाल्या आहेत. अमरावती मध्ये ९२ टक्के तर सगळ्यात कमी ठाणे जिल्ह्यात पेरण्या झाल्या आहेत. मक्याची आणि सूर्यफुलाची पेरणी राज्यात सर्वात जास्त आहे. राज्यात ४५ लाख हेक्टर पेरणी पूर्ण झाली असल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

शेतकरी आकडेवारीने संभ्रमात

रक्कम कमी आली असली तरी वरची रक्कम राष्ट्रकृत बँक देणार असल्याचेही ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज योजनेतील जे शेतकरी राहिले होते त्यांना रक्कम दिली जाईल. यात पात्र शेतक-यांना त्यांची रक्कम मिळणार आहे अशा संभ्रमात टाकणा-या वाक्यरचनेमुळे राज्यातील शेतकरी चक्रावून गेला आहे.

## माझी हत्या किंवा अटक शक्य आहे-हसीना शेख

यावेळी शेख हसीना यांनी यापूर्वी रॉयटर्सला दिलेल्या मुलाखतीचाही संदर्भ दिला. अवामी लीगचे कार्यकर्ते आणि नेते सध्या तीव्र दडपशाहीचा सामना करत आहेत. त्यामुळे मला काहीही झाले तरी मायदेशी परतायचे आहे. जर मला मृत्यूच यायचा असेल, तर तो माझ्या स्वत:च्या भूमीवर यावा, अशी माझी इच्छा आहे. तिथे माझे आई-वडील चिरनिद्रा घेत आहेत आणि जिथे त्यांचे रक्त सांडले आहे, असेही त्या म्हणाल्या.

## पतीविरोधात खोटी तक्रार दिली

अर्जे दाखल केली जात आहेत. दोन लहान मुलांचा सांभाळ करत असताना अशा खोट्या प्रकरणांमुळे कुटुंबावर प्रचंड मानसिक व सामाजिक ताण येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### भा.न्या.सं. कलम २१७ अन्वये कारवाईची मागणी

सदर प्रकरणाची वरिष्ठांनी प्रत्यक्ष व सखोल चौकशी करून मूळ सत्याचा शोध घ्यावा. ही तक्रार खोटी असल्याचे सिद्ध झाल्यास, भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम २१७ अन्वये अर्जदार मंजीत अशोक गाबडा याच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि आपल्याला योग्य तो न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती कल्याणी पवार यांनी केली आहे.

## भिमस्मृती दिनानिमित्त वाहतूक मार्गात बदल

अधिनियमानुसार अवजड वाहनांची वाहतूक शुक्रवारी (ता.३१) पुर्ण दिवसासाठी वळविण्यात येत आहे. चाळीसगाव चौफुली धुळे ते मालेगाव दिशेने जाणारी वाहतूक धुळे ते मालेगाव दिशेने जाणारी वाहतूक चाळीसगांव चौफुली, गरताड गाव, शिरुड चौफुली, हेंद्रुण, मोघण, आर्वी मार्गे मालेगावकडे. मालेगाव ते धुळे दिशेने येणारी वाहतूक मालेगाव ते धुळेकडे येणारी अवजड वाहनाची वाहतुक आर्वी मार्गे मोघण, हेंद्रुण, शिरुड चौफुली मार्गे चाळीसगांव चौफुली धुळे वळविण्यात येणार आहे. महामार्ग क्र.३ वर अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्यात आल्याने पोलीस प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, योग्य बंदोबस्त, बॅरेकेटींग करावे. योग्य त्याठिकाणी वाहतूक चिन्हे लावावे. या बदलाची वाहनचालक, वाहतुकदार, नागरिकांनी नोंद घ्यावी, असेही जिल्हाधिकारी विसपुते यांनी दिलेल्या आदेशात नमूद केले.

## ना.रावल व ना.शिरसाठ उपस्थित राहणार

आ.भदाणे, काकासाहेब खंबाळकर मुंबई, वाल्मिक दामोदर, सुर्यकांत वाघमारे महापौर लोणावळा, महेंद्र निळे, रमेश मकासरे भुसावळ, एस.आर.बागुल, रामभाऊ माणिक, रावसाहेब गिरासे, अमोल कबाडे, सतिष महाले, संजय जाधव, नगरसेवक सुनिल बैसाणे, राजु शिरसाठ, आबा खंडारे, संजय बैसाणे, नयना दामोदर, सरला निकम नेतेगण हजर राहणार आहेत.

## जामद्यात पोलीसांनी राबविले कोंबींग ऑपरेशन

ऑपरेशन राबविले. आरोपींचा शोध घेण्यासाठी मध्यरात्री सर्व सुसज्ज तयारीनिशी अचानक संपुर्ण जामदे गावास घेराव घातला. त्यांच्या घरांची झडती घेतली. परिसराची कसून तपासणी करीत फरार व पाहिजे आरोपींचा शोध घेण्यात आला. गावातील प्रत्येक रस्त्यावर तीव्र नाकाबंदी करण्यात आली. दुचाकी, चारचाकी वाहनांची कसुन तपासणी केली. विना कागदपत्रे आणि संशयितांची वाहने जप्त केली. गंभीर गुन्ह्यातील दोन महिलांसह एकुण २७ संशयितांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी करुन पुढील कारवाई करण्यात येत आहे.

### मुद्देमाल हस्तगत

कोंबींग व सर्च ऑपरेशनचे विशेष मोहिमेत मुद्देमाल हस्तगत व तपासणी करण्यात आली.

९७ हजार ७०० रुपये, चांदी ४.८० किलो, मोबाईल (१८), लॅपटॉप (२), दुचाकी वाहने (४३), चारचाकी (२), बेपत्ता दोन संशयित महिलांना पकडले, तर अन्य संशयीत २५ ताब्यात घेतले.

### धडक मोहिम सुरू

नागरिकांच्या सुरक्षेसाठी या प्रकारच्या अचानक व धडक मोहिम यापुढेही अधिक तिव्रतेने राबविण्यात येतील. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक ओंकार गवळी, सुधीर पाटील (धुळे ग्रामीण) यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, निरीक्षक धनंजय पाटील (धुळे तालुका), दीपक वळवी (साक्री), शिल्पा पाटील (मोहाडी नगर), राखीव पोलीस निरीक्षक मुकेश माहुले, सहाय्यक निरीक्षक किरण बर्गे (निजामपूर), मयुर भामरे (शिंदखेडा), दीपक ढोके, उपनिरीक्षक अमरजित मोरे, चेतन मुंढे, अमित माळी यांनी कारवाई केली.

## मा.आ.पाटलांतर्फे कर्जमुक्ती योजनेतील

बॅक पासबुक झेरॉक्स ही माहिती व कागदपत्र सोबत आणावीत. या सुविधेमुळे शेतकऱ्यांची गैरसोय दूर होणार असून आर्थिक खर्चही वाचणार आहे. त्यामुळे धुळे ग्रामीणमधील कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन मा.आ.कुणाल पाटील यांनी केले आहे.

## पवनचक्कीवरील अपघातात क.अभियंता

असा परिवार आहे. २६ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता मूळगावी ओसरली येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच नातेवाईक, मित्रपरिवार, सहकारी कर्मचारी तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली. उमदा, कर्तव्यदक्ष आणि सुस्वभावी तरुण अभियंत्याच्या अकाली निधनाने संपूर्ण परिसर हळहळला असून सर्व स्तरांतून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

ही घटना औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व खबरदारीच्या उपाययोजनांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित करणारी ठरत आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन, नियमित प्रशिक्षण आणि अत्याधुनिक सुरक्षा साधनांचा प्रभावी वापर याकडे सातत्याने लक्ष देणे ही काळाची गरज असल्याची भावना अनेकांकडून व्यक्त होत आहे.

## म.न.पाची ग्रॅच्युइटीची रक्कम त्वरीत द्या

वशिलेबाजीन काढण्यात येते. सेवा ज्येष्ठतेनुसार काढण्यात येत नसल्याने चौकशी करण्यात यावी. ग्रॅच्युइटी, शिल्लक रजेची तसेच सातव्या वेतनाची रक्कम दि.१५ ऑगस्ट पर्यंत न मिळाल्यास मनपा कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा लालबावटा म.न.पा. कामगार युनियन धुळेचे दिलीप वाघ यांनी निवेदनाद्वारे दिली.

## दोंडाईचा व अक्कलकोस नो फ्लायिंग झोन घोषित

ड्रोनद्वारे छायाचित्रण अथवा चित्रीकरण करता येणार नाही,असेही पोलीस अधीक्षक आनंद यांनी कळविले आहे.

## पान १ वरुन

## महावितरणच्या कार्यालयासाठी प्रस्ताव सादर करा

### कार्यालयासाठी त्वरित प्रस्ताव द्या

महावितरणची शहरातील विविध कार्यालये १० ते १२ किलोमीटरच्या परिघात असल्याने नागरिकांना आपल्या कामांसाठी विविध कार्यालयांत फेऱ्या माराव्या लागतात. यात त्यांच्या वेळेसह पैशांचाही अपव्यय होतो. या पार्श्वभूमीवर शहरातील मध्यवर्ती भागात महावितरणची सुमारे चार हजार चौरस मीटर जागा उपलब्ध असून, या जागेत मध्यवर्ती कार्यालय मंजुरीची मागणी आमदार अग्रवाल यांनी केली होती. त्यावर मंत्री बोर्डीकर यांनी तातडीने १५ ते २० कोटींचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले.

### उच्च-कमी दाब वाहिन्यांचे स्थलांतर

शहरातील पेठ भागातील उच्च व कमी दाबाच्या वीज वाहिन्या भूमिगत करण्यासह रोहित्रे स्थलांतरित करण्यात आली आहेत. याच पद्धतीने शहरातील विविध भागांतील उच्च दाब, कमी दाबाच्या वीजवाहिन्या भूमिगत करण्यासह रोहित्रे स्थलांतराची मागणी आमदार अग्रवाल यांनी केली होती. त्यासाठी शहराचा डीपीआर त्वरित सादर करण्याचे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री बोर्डीकर यांनी दिले.

### उच्चदाब वाहिन्यांना कोटेड कंडक्टर

धुळे शहरात बहुतांश ठिकाणी उच्चदाब वाहिन्या व खांब इमारतींच्या, झाडांच्या जवळून गेल्या आहेत. यामुळे पावसाळ्यात पाऊस व वादळामुळे अपघातांची शक्यता वाढते. ती टाळण्यासाठी धुळे शहरासाठी टप्प्याटप्प्याने सुमारे १५० किलोमीटर कोटेड कंडक्टर टाकावेत, १०० किलोमीटर एबी केबल टाकावी तसेच रस्त्यांच्या मधोमध असलेले वीजखांब, वाहिन्या स्थलांतरित करण्याची मागणी आमदार अग्रवाल यांनी केली. त्यावर मंत्री बोर्डीकर यांनी याबाबत वीज अधिकाऱ्यांनी याबाबतचे ब्लॅक स्पॉट शोधावेत, कामासाठी त्वरित डीपीआर तयार करावा व तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश बैठकीत दिले.

### मलशुद्धीकरणासाठी स्वतंत्र वीजजोडणी

महापालिकेतर्फे शहरातील अमृत अभियानांतर्गत एमएलडी मलशुद्धीकरण केंद्रासाठी ९७० किलोवॉट वीज जोडणी आवश्यक असल्याचा मुद्दा आमदार अग्रवाल यांनी बैठकीत उपस्थित केला. यावर यासंबंधी महापालिकेने तातडीने प्रस्ताव द्यावा, तसेच महावितरणच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी लगेच हा प्रस्ताव मंजूर करण्याचे निर्देश मंत्री बोर्डीकर यांनी दिले. यामध्ये उपकेंद्रातील पाच एमव्हीए रोहित्राचा खर्च महावितरण कंपनीने करावा, तसेच पुढील उच्चदाब वाहिनीसह संबंधित कामांसाठी शासनाकडून निधी देण्याची ग्वाही मंत्री बोर्डीकर यांनी दिली. तसेच शहरातील पाणीपुरवठा केंद्रांसह अक्कलपाडा योजनेच्या जॅकवेलसाठी सुरळीत वीजपुरवठ्याचे निर्देशही त्यांनी दिले.

### कुंडाणे उपकेंद्राची क्षमता वाढ

शहरातील देवपूर भागाला महापारेषणच्या कुंडाणे येथील ४०० किलोवॉटच्या उपकेंद्रातून २५ एमव्हीएच्या रोहित्रांद्वारे वीजपुरवठा होतो. यात अनेकदा रोहित्रावर वीजभार वाढल्याने वीजपुरवठा खंडित होतो. यामुळे क्षमता वाढ व निरंतर वीज योजनेंतर्गत २०० केव्हीए क्षमतेचे २५,१०० केव्हीए क्षमतेची ५० रोहित्रे बसविण्याची मागणी आमदार अग्रवाल यांनी केली. यावर मंत्री बोर्डीकर यांनी येत्या ऑगस्ट महिनाअखेर हे काम पूर्ण करण्याची सूचना स्थानिक अधिकाऱ्यांना दिली.

### ३३ केव्ही बे व्यवस्था

शहरातील उद्योगनगर उपकेंद्रातून औद्योगिक वसाहतीला वीजपुरवठा होतो. यात यूजी केबलमध्ये बिघाड झाल्यास औद्योगिक वसाहतीचा वीजपुरवठा वारंवार खंडित होतो. यामुळे उद्योजकांचे मोठे नुकसान होते. यासाठी उमरावनगर उपकेंद्रासाठी कुंडाणे उपकेंद्रावरून ३३ केव्ही बे व्यवस्था उपलब्ध करणे, उद्योगनगर उपकेंद्रासाठीही केव्ही बे व्यवस्था उपलब्ध करण्यासह औद्योगिक वसाहतीला जोडणाऱ्या फिडरसाठी पर्यासाठी फिडर व बे ब्रेकरची मागणी आमदार अग्रवाल यांनी केली. त्यावर अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री बोर्डीकर यांनी दिले.

### औद्योगिक जोडण्या देताना अनेकदा विलंब

आमदार अग्रवाल यांनी सांगितले, की उच्च दाब, कमी दाब वीजवाहिन्या, पोल व रोहित्रे स्थलांतराचे प्रस्ताव महावितरणकडे पाठविले जातात. मात्र, अनेकदा अंदाजपत्रक, मंजुरी प्रलंबित राहते. तसेच औद्योगिक जोडण्या देतानाही अनेकदा विलंब होतो. यावर प्रत्येक प्रलंबित प्रस्तावासाठी कालमर्यादा व नुकसान भरपाईसाठी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी, औद्योगिक व सार्वजनिक उपयोगाच्या कामांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी केली असता यावर उचित कार्यवाही करावी, असे मंत्री बोर्डीकर यांनी सांगितले.

## नगरसेवकांच्या कामांची अडवणूक

आली. परंतु, नगराध्यक्षांनी जाणीवपूर्वक १५ दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर सोळाव्या दिवशी विशेष सभा बोलावली. धक्कादायक बाब म्हणजे या सभेचा अजेंडा भाजपच्या नगरसेवकांना देण्यातच आला नाही आणि कोणतीही चर्चा न करता ती सभा तडकाफडकी तहकूब करण्यात आली.त्यानंतरही सर्वसाधारण सभा पार पडल्या मात्र भाजप नगरसेवकांनी सुचविलेले विषय अजेंड्यावरून हेतुपुरस्सर वगळण्यात आले.गेल्या दोन महिन्यांपूर्वी झालेल्या सर्वसाधारण सभेत शहादे नगरपरिषद हद्दीतील रस्ते दुरुस्ती व डागडुगीच्या विषयाला भाजप नगरसेवकांनी पूर्ण पाठिंबा देत मंजुरी दिली होती. तसेच ही कामे त्वरित सुरू करण्याची आग्रही मागणीही केली होती. परंतु, आज दोन महिने उलटूनही शहरातील खराब रस्त्यांची साधी डागडुगी किंवा दुरुस्ती झालेली नाही. यासंदर्भात नगरपालिकेच्या संबंधित विभागाला व अधिकाऱ्यांना वारंवार विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली जातात.रस्त्यांसोबतच शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता व दिवाबत्ती या अत्यंत महत्त्वाच्या नागरी सुविधांच्या विषयांना भाजप नगरसेवकांनी प्राधान्यक्रमाने मंजुरी दिलेली आहे. नगरपालिकेत ठराव मंजूर झाल्यानंतर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासनाची आणि सत्ताधारी नगराध्यक्षांची असते. मात्र, स्वतः ची प्रशासकीय निष्क्रीयता झाकण्यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून भाजपचे नगरसेवक विकास कामांना विरोध करत आहेत असा दिशाभूल करणारा व कुटील अपप्रचार शहादेकरांमध्ये पसरवला जात आहे. या खोट्या प्रचाराचा शहादेकरांसमोर पर्दाफाश व्हावा यासाठीच या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे प्रतिनिधींनी स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेत प्रमुख लोकप्रतिनिधींनी मनोगत व्यक्त केले.यावेळी बोलताना बांधकाम सभापती संतोष वाल्हे म्हणाले,आम्ही आतापर्यंत नगराध्यक्षांकडे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी तब्बल अडीचशे विषय सुचविलेले आहेत. मात्र, नगराध्यक्षांनी अद्यापही शहर विकासाचा सकारात्मक विचार केलेला दिसत नाही. केवळ राजकीय सूडबुद्धी बाजूला ठेवून त्यांनी शहादा शहराच्या हितासाठी सर्व विकास कामांना त्वरित मंजुरी द्यावी, अशी जाहीर विनंती आम्ही या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून करत आहोत.

उपनगराध्यक्ष सौ. माधवी मकरंद पाटील यांनी सांगितले की,शहरात भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांबाबत जाणीवपूर्वक अपप्रचार केला जात आहे. भाजपकडे बहुमत असल्यामुळे कामे होऊ दिली जात नाहीत, असा भ्रामक आक्षेप सत्ताधारी घेत आहेत. परंतु खरी वस्तुस्थिती ही आहे की, आम्ही सुचवलेली कामे नगराध्यक्ष अजेंड्यावरच घेत नाहीत आणि जनतेची दिशाभूल करत आहेत. केवळ मबोलबच्चनपणाफ करून जनतेला जास्त दिवस फसवता येत नाही, हे सत्ताधाऱ्यांनी आणि नगराध्यक्षांनी लक्षात असू द्यावे.

भारतीय जनता पक्षाचे सभागृह प्रतोद ज्ञानेश्वर चौधरी यांनी म्हटले,आम्ही शहराच्या विकासासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे रीतसर पत्र देऊन सतत पाठपुरावा केला आहे. कालच दिनांक २८ जुलै रोजी पार पडलेल्या स्थायी समितीच्या सभेत बांधकाम विभागाच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली आहे. नगराध्यक्षांनी आता तरी योग्य व सकारात्मक निर्णय घ्यावा. शहरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था लक्षात घेता त्वरित डागडुजीचे काम हाती घ्यावे, तसेच शहरातील पाटचारी सफाईच्या कामालाही तात्काळ मंजुरी देऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी.

या पत्रकार परिषदेला उपनगराध्यक्ष माधवी मकरंद पाटील, भाजपचे सभागृह प्रतोद ज्ञानेश्वर चौधरी, बांधकाम सभापती संतोष वाल्हे यांच्यासह नगरपरिषदेच्या विविध विषयांकित समित्यांचे सभापती आणि भारतीय जनता पक्षाचे सर्व सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आर.सी.पटेल उर्दू प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांचे स्कॉलरशिप परीक्षेत यश

**शिरपूर, दि.२९- आर. सी. पटेल उर्दू प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच पार पडलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत गुणवत्ता यादीत मानाचे स्थान मिळवले आहे. या दैदिप्यमान यशाबद्दल मेरिटमध्ये आलेल्या या गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक आणि सत्कार समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**

सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डॉ. इफ्तेखार, प्रमुख पाहुणे शिक्षण मंडळ माजी सभापती जाकीर शेख व पालक उपस्थित होते. त्यांच्या हस्ते स्कॉलरशिप परीक्षेत मेरिटमध्ये आलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक डॉ. इफ्तेखार म्हणाले की, इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. हे यश विद्यार्थ्यांची जिद्द, त्यांचा नियमित अभ्यास आणि त्यांना लाभलेले शिक्षकांचे अचूक मार्गदर्शन यांचे फळ आहे. भविष्यातही या विद्यार्थ्यांनी अशीच प्रगती करत राहावी आणि आपल्या आई-वडिलांचे व शाळेचे नाव उज्वल करावे. या सत्कार समारंभामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यशाचा आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, सचिव राजगोपाल भंडारी, ट्रस्टी रेषा पटेल, सर्व ट्रस्टी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, मुखाध्यापक डॉ. इफ्तेखार अहमद यांनी कौतुक केले.

## दंडेवाले बाबा तपोभूमीत गुरुपौर्णिमा उत्सव संपन्न

धुळे, दि.२९- गुरुपौर्णिमेनिमित्त देवपूर-वाडी भोकर रोडवरील पंचायत समितीजवळ असलेल्या प.पू. सद्गुरु दंडेवाले बाबा तपोभूमीत गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ॲड. जवाहर पाटील, गोविंद साखला, विजय चौधरी, सुनील खरात, मुस्ताक अन्सारी, राजकुमार पाटील, नितीन कांबळे, पंकज पाटील, सिद्धार्थ देवरे, सुरेश पाटील, जितेंद्र बोरसे यांच्यासह मोठ्या संख्येने सेवेकरी व भाविक उपस्थित होते.

## निधन वार्ता

### सुनिल राजपूत

नंदुरबार, दि.२९- शहरातील जुनी भोई गल्ली, जुनी डीडीसी बँक परिसरातील रहिवासी सुनिल हिरालाल राजपूत यांचे मंगळवारी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, मुलगा, सुन, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र राजपूत यांचे ते वडील तसेच भाजीपाला व्यापारी दिनकर राजपूत, चंद्रकांत राजपूत, गोरख राजपूत,किशोर रमण राजपूत, कांतीलाल राजपूत यांचे बंधु व राजेंद्र भोलेसिंग राजपूत यांचे काका होत.

### मनोहर चव्हाण



कानळदा, दि.२९- मनोहर भाऊराव चव्हाण यांचे मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे.

**पाहिजेत**
दुकान कामासाठी मुले पाहिजेत.
गॅरेज लाईन अनुभव असल्यास प्राधान्य.
9823241749
8329784099

**WANTED**
Experienced Pharmacist
Minimum 1 year Experience
Contact
8788637592

**१६ वे पुण्यस्मरण**



**कै. सौ. मंगला मोहन पाठक**
(स्वर्गवास् दि. ३०/७/२०१०)
तुमच्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रध्दांजली सुमनांजली
शोकाकुल
मोहन पंडित पाठक (पति)
प्रा.डॉ.निलेश मोहन पाठक (मुलगा) सौ.जान्हवी निलेश पाठक (सून)
श्री.कुणाल हेमंत भावे (जावाई) सौ.रुपाली कुणाल भावे (मुलगी)
श्री. दिपक कमलाकर दिक्षित (भाऊ)
चि. राघव निलेश पाठक (नातू)
कु. नक्षत्रा कुणाल भावे (नात)
समस्त पाठक, दिक्षित आणि भावे परिवार,देवपूर धुळे.

**भाड्याने देणे आहे**
धुळे अवधान येथील MIDC येथील ई.७४ या प्लॉट मध्ये १००० ते १२०० चौ.फुटाची शेड भाड्याने देणे आहे.
संपर्क
श्री.द्रुमिल जोशी 9423982170
श्री.आशुतोष जोशी 9422289520

**पाहिजेत**
धुळे जिल्ह्यात समर्थ होम अप्लायन्स कंपनीला कामासाठी मुले, स्त्री, पुरुष व ड्रायव्हर त्वरीत भरती आहे, शिक्षणाची अट व वयाची अट नाही. पगार : १५००० ते २००००
: संपर्क :
7447422022
9021776720

**पाहिजेत**
अकाऊंटच्या कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा किंवा मुलगी पाहिजे. Tally Oprat करता यायला पाहिजे.
साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजीअरी
गल्ली नं.२, मुल्लाबाडा रोड अकबर चौक, धुळे
9422286958
7350148955

**पाहिजेत**
कामासाठी हेल्पर मुलगी पाहिजे.
समक्ष भेटा!
किडस् शॉपी
टॉवर गार्डन जवळ, कॉंग्रेस भवनासमोर, धुळे
9422219164

**पाहिजेत**
- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**पाहिजेत**
हॉटेल प्रितम रेस्टरनसाठी मॅनेजर पाहिजे. अनुभवी कॉम्प्युटरचे ज्ञान असणे आवश्यक.
साक्री रोड, नविन महापालिका समोर, धुळे
9765901313

**पाहिजेत**
ऑफिस असिस्टंट पाहिजेत
शिक्षण योग्यता कॉम्प्युटर ज्ञानानुसार पगार दिला जाईल.
-: संपर्क :-
वानखेडे
7843078387

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी खालील जागा भरणे आहे.
सेल्समन -३
हेल्पर - २
समक्ष येऊन भेटा
बेबीज वर्ल्ड
ग.नं.२, नानक हार्डवेअर, धुळे
9850835999

**पाहिजेत**
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) सेल्समन
३) दुकान काम हेल्पर
अनुभव असल्यास प्राधान्य.
-: संपर्क :-
8888096777

**भाड्याने देणे आहे**
जयहिंद सिनियर कॉलेज जवळील पेन्ट हाऊस देणे आहे. 3 BHK शासकीय, निमशासकीय अधिकारी वर्गासाठी
भुपेंद्र रनमळे
8149310000

**घर भाड्याने देणे**
१४, भिवसन नगर, वाडीभोकर रोड, देवपूर धुळे
-: संपर्क :-
9765009330

**पाहिजेत**
१) बॅनर मशीन ऑपरेटर पाहिजे.
२) हेल्पर पाहिजे.
सुयोग डिजीटल प्रिंटर्स
श्रीराम कॉम्प्लेक्स, पॉवर हाऊसजवळ, साक्रीरोड, धुळे.
मो.8087524209

**पाहिजेत**
विकास दुध पाऊच पॅकींग वाटपसाठी मुले पार्टटाईम पाहिजेत.
समक्ष भेटा- स.११ ते १२
विकास दुध, नवग्रही ग.न.२, उषा ड्रेसेस समोर, पारोळा रोड, धुळे
9890030422
8600773021

Godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०